# मे. दिवाणी न्यायाधीश साहेब क. स्तर यांचे न्यायालयात

## अंबाजोगाई

रे. दि. दा. /२०२६

**वादी : १) अमोल पि नागोराव घोडके** Rch-1/B

वय : ४० वर्षे धंदा शेती

रा. सावता माळी चौक, अंबाजोगाई जिल्हा बीड

**२) संगीता भ्र. शिवाजी गायकवाड**

वय : ४५ वर्षे धंदा गृहिणी

रा. सावता माळी चौक, अंबाजोगाई जिल्हा बीड

**विरुद्ध**

**प्रतिवादी : मुख्याधिकारी साहेब**

नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई जिल्हा बीड

**प्रकरण** : चिरकाल मनाई हुकूम मिळणे बाबत.

**प्रस्तुतचे प्रकरण वादी खालील प्रमाणे विनंतीपूर्वक मा. न्यायालयात दाखल करीत आहेत**

१)हे की, सदर प्रकरणात वादी क्र १ व २ हे आपसात सख्खे बहिण भाऊ असून प्रतिवादी हा अंबाजोगाई नगरपरिषद अंबाजोगाईचा मुख्य अधिकारी आहे.

२)हे की, कसबे अंबाजोगाई नगरपालिका हद्दीतील वादीच्या मालकी व कब्जेची मिळकत जमीन सर्वे नंबर १७२/1 पैकी १ मधील एकूण क्षेत्रफळ १ एकर ६ आर इतक्या मिळकतीवर वादींचा वडिलोपार्जित मालकी हक्क व कब्जे ताबा आहे

सदर मिळकती वर वादी यांनी नगरपरिषद अंबाजोगाई महाराष्ट्र गुंठेवारी विकास नियमाधीन प्रमाणपत्र दिनांक १०/०४/२०१९ रोजी प्रतिवादी कडून लेआउट मंजूर करून घेतलेला आहे सदर लेआउट मंजूर करण्यापूर्वी तालुका भूमी अभिलेख कार्यालय अंबाजोगाई यांच्याकडून सदर जमिनीची वादी यांनी प्रतिवादी व नगररचनाकार अंबाजोगाई यांच्या सांगण्यावरून दिनांक २४/०३/२०१७ रोजी मोजणी करून कायदेशीर रित्या लेआउट प्रमाणे सदर वादग्रस्त मिळकतीमध्ये साडेसात मीटर पैकी ३ मीटर जागेचा रस्ता स्वतःच्या मालकीच्या जमिनीतून सोडल्याचे दर्शविले आहे व उर्वरित साडेचार मीटर लगत शेजारी एकनाथ जनार्दन घोडके यांच्या जमिनीतून त्यांनी त्यांच्या लेआउट मध्ये दक्षिण बाजूने पूर्व पश्चिम रस्त्यासाठी सोडलेली आहे अशे दर्शविले आहे.

३)हे की, वादी व त्याचा लगत शेजारी एकनाथ जनार्दन घोडके यांच्या जमिनीच्या मधोमध साडेसात मीटरचा रस्ता नगरपालिका अंबाजोगाईच्या लेआउट प्रमाणे मंजूर असताना आज दिनांक १६/०२/२०२६ रोजी मुख्याधिकारी नगरपरिषद कार्यालय अंबाजोगाई यांच्या कर्मचाऱ्यांनी बेकायदेशीरपणे वादीला कोणत्याही प्रकारची नोटीस न देता व सूचना न देता वादीच्या जमिनीमध्ये अंदाजे पाच फूट इतक्या जमिनीवर पूर्व पश्चिम अतिक्रमण करून नऊ मीटरचा रस्ता बेकायदेशीरपणे बनवण्यासाठी आज रोजी वादग्रस्त मिळकतीमध्ये येऊन काम करण्याचा प्रयत्न करीत आहेत

४)हे की, जमीन सर्वे नंबर १७२/1 पैकी 1 मध्ये सदर लेआउट प्रमाणे वादी हे स्वतः चार हजार स्क्वेअर फुट मध्ये घर व सावता माळी मंदिर बांधलेले आहे तसेच सदर जमिनीपैकी व सदर लेआउट प्रमाणे नामे वैजनाथ यशवंत फड फड यांना साडेचार हजार स्क्वेअर फुट जागा खरेदीखत क्रमांक.1113 /.2020 अन्वये दिनांक3/.03/२०20 रोजी विक्री, हस्तांतरित केलेली आहे सदर खरेदी खताआधारे फड यांनी त्यांची स्वतंत्र पीटीआर प्रतिवादी यांनी करून दिली आहे तसेच वादी यांच्या घराचे सुद्धा पी टी आर प्रतिवादी यांनी करून दिले आहे सदर लेआउट

प्रमाणे वैजनाथ यशवंत फड यांना यांना प्रतिवादीने बांधकाम परवाना देऊन सदर जागेवर बांधकाम झालेले आहे असे असताना प्रतिवादी कोणत्याही कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता कायदेशीरपणे वादीच्या बांधलेल्या घराचे व मोकळ्या जागेतील झाडाचे अंदाजे एकूण ५ कोटीचे नुकसान करून सदर जागेवर अतिक्रमण करीत आहेत नुकसान झालेले आहे ते कशाने भरून येणार नाही करिता प्रतिवादी यांनी वादीच्या मालकी कब्जेच्या जमीन सर्वे नंबर १७२/१ पैकी १ मध्ये प्रतिवादी यांनी स्वतः किंवा इतर मार्फत येऊन बेकायदेशीरपणे हरकत व अडथळा तसेच अनधिकृतपणे अतिक्रमण करून रस्ता सदर जागेमध्ये करू नये अशा स्वरूपाचा चिरकाल मनाई हुकूम वादीच्या हक्कात व प्रतिवादीचे विरुद्ध देण्यात यावा

५) हे की, प्रतिवादी यांनी येऊन वादीच्या शांततामय उपभोगास दिनांक १६/०२/२०२६ रोजी अडथळा निर्माण केला हे वाद उत्पत्तीचे कारण आहे व वाद उत्पत्तीची दिनांक ही दिनांक १६/०२/२०२६ आहे व आजतागायत घडत आहे

६) हे की, वादग्रस्त मिळकत ही मौजे अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड येथील आहे त्यामुळे मा. न्यायालयास सदरील दावा चालवण्याचा व ऐकण्याचा संपुर्ण अधिकार आहे.

७) हे की, वादी आपल्या दाव्याची किंमत १,०००/- रुपये करत असुन प्रस्तुत दावा वादग्रस्त मिळकतीचे चिरकाल मनाई हुकूम मिळणे बाबतचा असल्यामुळे त्यावर ठराविक कोर्ट फिस २०० रु देत आहे जी योग्य व पुरेशी आहे.

## तरी विनंती की

१)वादीच्या मालकी कब्जेच्या जमीन सर्वे नंबर १७२/१ पैकी १ मध्ये प्रतिवादी यांनी स्वतः किंवा इतर मार्फत येऊन बेकायदेशीरपणे हरकत व अडथळा तसेच अनधिकृतपणे अतिक्रमण करून रस्ता सदर जागेमध्ये करू नये अशा स्वरूपाचा चिरकाल मनाई हुकूम वादीच्या हक्कात व प्रतिवादीचे विरुद्ध देण्यात यावा

२)वादी इतर कोणत्याही हक्काचा हक्कदार असेल तर तो हक्क वादीस देण्यात यावा

३) सदर दाव्यास वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या दुरुस्त्या बाबत परवानगी देण्याचा हक्क वादीस देण्यात यावा.

**दिनांक १६/०२/२०२६**

**वादी**

**१) अमोल पि नागोराव घोडके**

**२)संगीता भ्र. शिवाजी गायकवाड**

**पडताळणी**

मी शपथेवर निवेदन करतो की वरील दाव्यातील संपूर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर आम्ही समजून सह्या केल्या आहेत

**दिनांक १६/०२/२०२६**

**वादी**

**१) अमोल पि नागोराव घोडके**

**२)संगीता भ्र. शिवाजी गायकवाड**

**मार्फत**

**ॲड. एस. व्हि. कुलकर्णी**